राज्यातील शासकीय मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्रातून उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांचे विक्रीचे दर सुधारित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्र: मत्स्यवि-२०२०/प्र.क्र. ७४/पदुम-१३**

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**

**दिनांक : ०३ जून, २०२१**

वाचा :-

१). आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र: मत्स्य/भू/०२०३०१/०३/२०१४, दि. ३१/०१/२०१४

२). शासन परिपत्रक क्र. मत्स्यवि-२०१८/प्र.क्र.२०७/पदुम-१३, दि. २६ /११/२०१८

३). आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे जा.क्र. मत्स्य/भू/०२०१०४/६७/३१०/२०२०, दि. २१/०८/२०२० रोजीचे पत्र.

४). आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे जा.क्र. मत्स्य/भू/०२०१०४/६७/३४३/२०२०, दि. १८/०९/२०२० रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्यात ४.१८ लाख हेक्टर गोड्या पाण्याचे क्षेत्र उपलब्ध असून यामध्ये लहान मोठे पाटबंधारे जलाशय,गाव तलाव यांचा समावेश आहे. उपलब्ध जलक्षेत्राचा विचार करता मत्स्यसंवर्धन करण्यास प्रचंड वाव आहे. भुजलाशयीन क्षेत्रामध्ये मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी मत्स्यशेतकरी, मत्स्य संवर्धक व मत्स्य कात्स्यकार यांना उत्तम प्रतीचे मत्स्यबीज पुरवठा करणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने ३२ मत्स्यबीज उत्पादन केंद्र, २ कोळंबीबीज उत्पादन केंद्र, ३२ मत्स्यबीज संवर्धन केंद्र व १ कोंळबीबीज संवर्धन केंद्र याप्रमाणे ६७ केंद्रांची स्थापना केलेली आहे. सद्यस्थितीत राज्याची एकूण मत्स्यबोटुकलीची मागणी सुमारे ११४ कोटी असून शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र व संवर्धन केंद्रातून होणारे उत्पादन पुरेसे नसल्याने तसेच महाराष्ट्र राज्याचे मत्स्यबीज विक्री दर इतर राज्यांच्या तुलनेत वाढीव असल्याने राज्यातील मत्स्यसंवर्धक शासकीय केंद्रातून मत्स्यबीज न घेता इतर राज्यांतून मत्स्यबीज खरेदी करून संवर्धन करत आहेत. तथापि परराज्यांतून आयात करण्यात येणारे मत्स्यबीज निकृष्ट दर्जाचे तसेच मरतूक (Mortality Rate) जास्त प्रमाणात होणारे असल्याने मत्स्य उत्पादनात तफावत आढळून येत आहे व शासकीय मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्रामधून विक्री कमी होत असल्याने सदर केंद्रे तोट्यात चालत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

सबब राज्यात उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांची जास्तीत जास्त विक्री होण्याच्या दृष्टीने व परराज्यातून होणारी आयात कमी व्हावी या उद्देशाने मत्स्यबीजांच्या विक्री दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आता शासन या निर्णयाद्वारे राज्यातील शासकीय मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्रातून उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांचे विक्रीचे दर खालील प्रमाणे नमूद अटी व शर्तींसह सुधारित करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र | प्रजाती | मत्त्स्यजीरे (८ ते १२ मि.मि) प्रति लक्ष | मत्स्यबीज (२० ते २५ मि.मि) प्रति हजार | अर्धबोटुकली (२५ ते५० मि.मि) | बोटुकली (५० मि.मि चे वर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख कार्प | १०००/- | १२५/- | २५०/- | ५००/- |
| २ | मृगळ | ८००/- | १२५/- | २५०/- | ५००/- |
| ३ | रोहू | ८००/- | १२५/- | २५०/- | ५००/- |
| ४ | कटला | १०००/- | १५०/- | ३५०/- | ६००/- |
| ५ | गवत्या/चंदेऱ्या | १०००/- | १५०/- | ३५०/- | ६००/- |
| ६ | सायप्रिनस | १०००/- | १५०/- | ३५०/- | ६००/- |

| अ.क्र | प्रजाती | मत्स्यजीरे (लाखात) | ९-२० mm | २१ - ३५ mm | ३६-५० mm | ५१-८० mm | ८१-१२० mm |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पंगेशियस | - | ४०० | ८०० | ८०० | २००० | ३००० |
| २ | गिफ्ट तिलापिया | - | १००० | २००० | ३००० | ४५०० | ७००० |

| अ.क्र | प्रजाती | |
|---|---|---|
| १ | स्कॅम्पी | PL २०; रु. २ प्रती नग |

१. राज्यातील मत्स्यव्यवसायिक सहकारी संस्था, खाजगी व्यवसायिक व इतर शेततळी धारक हे शासकीय मत्स्यबीज केंद्र व शासन मालकीच्या भाडेपट्टीने देण्यात आलेल्या केंद्रामधून मत्स्यबीज/मत्स्यबोटुकलीची खरेदी करतील याकरिता संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी संवर्धकांना याबाबत प्रचार, प्रसार व प्रोत्सहित करावे.

२. शासकीय मत्स्यबीज केंद्रावर नियोजनाप्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या मत्स्यबीजाबाबत माहिती ठेकेदार यांनी संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना दरवर्षी ३१ जून पर्यंत कळवावी. त्यानुसार जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय ठेकेदार/सहकारी संस्था/ मत्स्यसंवर्धक यांचेकडून प्राप्त मागणी व पुरवठ्याचे नियोजन संबंधित सहायक आयुक्त

मत्स्यव्यवसाय यांनी जिल्ह्यातील मत्स्यबीज केंद्र ठेकेदार यांचेशी समन्वयाने करावे. सदर मत्स्यबीज पुरवठ्याचा तिमाही अहवाल संबधित ठेकेदार यांचेकडून प्राप्त करुन संबंधित सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३८/१४३१, दि. ०२/०२/२०२१ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८५/ व्यय-२, दि. २४/०२/२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२१०६०३१६५३१८१८०१** असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

शास्त्री

(श्रीनिवास शास्त्री)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.
३. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सर्व प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय
६. सर्व सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय
७. निवडनस्ती (कार्यासन पदुम-१३).